लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

कॉलेजच्या कट्ट्यावर

# पोदार महाविद्यालयात शालेय विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा



**मुंबई :** शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यातील आत्मविश्वास वृद्धिंगत करण्यासाठी माटुंग्यातील आर. ए. पोदार महाविद्यालयात 'मनाच्या गावाला जाऊया' या विशेष कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

भावनिक सशक्तीकरणावर भर देणे, विद्यार्थ्यांना स्वतःमधील सुप्त गुणांची ओळख करून देणे आणि यशाचा दृष्टिकोन विकसित करणे, हा कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. इयत्ता आठवी आणि इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे खेळ आणि उपक्रमांद्वारे विस्तृत माहिती देण्यात आली. तसेच संबंधित विषयांतील बारकावे समजावून सांगण्यात आले. शीतल रवी आणि सुखदा केळकर यांनी विविध सत्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री दयानंद बालक बालिका विद्यालय, माटुंगा प्रीमियर स्कूल, इंडियन एज्युकेशन सोसायटीचे दिगंबर पाटकर विद्यालय, इंडियन एज्युकेशन सोसायटीचे राजा शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, शिशुविहार हायस्कूल या विविध शाळांमधील प्रत्येकी ३० विद्यार्थी आणि १ शिक्षक कार्यशाळेत सहभागी झाले होते. आर. ए. पोदार महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शोबना वासुदेवन यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. स्वयंविकास केंद्राच्या शिक्षक प्रमुख आणि उपमुख्याध्यापिका कविता जाजू यांनी कार्यशाळेच्या उद्देशांची रूपरेषा मांडली.

05/03/2024 | Mumbai Sahadainik | Page : 04
Source : https://epaper.loksatta.com